# बोर्ड प्रश्नपत्रिका : मार्च २०१५

## भूगोल आणि अर्थशास्त्र

**वेळ : २ तास** **एकूण गुण : ४०**

**सूचना:**

i. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.
ii. उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.
iii. प्र.३ (अ), (ब), (क) संपूर्णपणे नकाशा, आलेख पुरवणीवरच सोडवावा व तो मुख्य उत्तरपत्रिकेस जोडावा.
iv. नकाशा काढण्यासाठी स्टेन्सिलचा वापर करण्यास परवानगी आहे.
v. १ ते ४ प्रश्न भूगोलाचे व ५ ते ७ प्रश्न अर्थशास्त्रावरील आहेत.
vi. आवश्यक तेथे सुबक आकृत्या काढा व नकाशाचा वापर करा.

---

१. (अ) **कंसात दिलेल्या पर्यायांपैकी योग्य तो पर्याय निवडून विधाने पूर्ण करा व उत्तरपत्रिकेत पुन्हा लिहा :** [३]

१. क्षेत्रफळाच्या दृष्टीने भारत हा जगातील _______ क्रमांकाचा मोठा देश आहे.
(पाचव्या, सहाव्या, सातव्या, चौथ्या)

२. राजस्थानच्या मैदानी प्रदेशाला _______ म्हणतात.
(सहारा वाळवंट, कलहारी वाळवंट, गोबी वाळवंट, भारतीय महावाळवंट)

३. मध्य अंदमानच्या पूर्वेला असणारे _______ बेट हा भारतातील एकमेव जिवंत ज्वालामुखी आहे.
(निकोबार, बॅरन, मालदीव, लक्षद्वीप)

(ब) **'अ' स्तंभातील घटकांशी 'ब' स्तंभातील घटकांबरोबर योग्य जोड्या लावा :** [३]

| | 'अ' स्तंभ | | 'ब' स्तंभ |
|---|---|---|---|
| १. | गुरूशिखर | अ. | खनिजसंपत्तीने समृद्ध |
| २. | छोटा नागपूर पठार | ब. | अरवली पर्वत |
| ३. | खादर | क. | जुनी जलोढ मृदा असते |
| | | ड. | नवीन जलोढ मृदा असते |

२. (अ) **भौगोलिक कारणे लिहा (कोणतेही दोन) :** [४]

१. भूगोलाच्या अभ्यासात प्रादेशिक दृष्टिकोन हा अत्यंत महत्त्वाचा असतो.
२. हिमालय हा भारतातील हवामान स्थिती निश्चित करतो.
३. लक्षद्वीप बेटे हे पर्यटकांचे आकर्षण बनले आहे.
४. उत्तर भारतीय पर्वतीय प्रदेश हा भटक्या जमातीचे माहेरघर आहे.

(ब) **थोडक्यात टिपा लिहा (कोणत्याही दोन) :** [४]

१. देवभूमी (उत्तराखंड)
२. पश्चिम घाटातील नैसर्गिक वनस्पती आणि प्राणिजीवन
३. मलबार किनारपट्टी

३. (अ) खाली दिलेल्या सांख्यिकीय माहितीच्या आधारे साधा रेषालेख काढा : [२]

**भारताची लोकसंख्या**

| वर्ष | दशलक्षांमध्ये लोकसंख्या |
|---|---|
| १९७१ | ५४८ |
| १९८१ | ६८३ |
| १९९१ | ८४६ |
| २००१ | १०२८ |
| २०११ | १२१० |

(ब) **खालील नकाशाचे वाचन करून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा (कोणतेही दोन) :** [२]




**प्रश्न :**

१. कोणत्या नदीने तामिळनाडू राज्याच्या किनारपट्टीवर त्रिभुज प्रदेश तयार केला आहे?

२. गुजरात किनारपट्टीवरील एका आखाताचे नाव लिहा.

३. कळसूबाई शिखर कोणत्या घाटावर आहे?

४. पश्चिम घाटातील सर्वाधिक उंचीच्या शिखराचे नाव लिहा.

(क) **तुम्हास पुरविलेल्या भारताच्या आराखड्यात पुढील बाबी दाखवा व त्यांना नावे द्या (संकेत सूची आवश्यक) (कोणतेही दोन) :** [२]

१. अंदमान आणि निकोबार बेटे

२. के-२

३. मुंबई बंदर

४. गंगा नदी

**४. पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा (कोणतेही दोन) :** **[८]**

१. पंजाब-हरियाणा मैदानी प्रदेशातील हवामानाच्या वैशिष्ट्यांचे वर्णन करा.

२. गंगेच्या मुखाकडील मैदानी प्रदेशातील उद्योगधंद्यांचे वितरण लिहा.

३. भारताच्या मध्यवर्तीय उच्चभूमी पठारी प्रदेशातील शेतीची वैशिष्ट्ये सांगा.

**५. रिकाम्या जागी योग्य तो पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा:** **[२]**

१. आर्थिक प्रश्न मुख्यत: साधनांच्या ________ निर्माण होतो.

(विपुलतेमुळे, दुर्मिळतेमुळे, उपलब्धतेमुळे)

२. 'ना नफा ना तोटा' या तत्त्वावर वस्तू व सेवांचे उत्पादन व त्यांचा पुरवठा ________ क्षेत्राद्वारे केला जातो.

(संयुक्त, खाजगी, सार्वजनिक)

**६. प्रत्येकी एक किंवा दोन वाक्यांत उत्तरे लिहा (कोणतेही तीन) :** **[६]**

१. नैसर्गिक साधनसंपत्तीची दोन उदाहरणे द्या.

२. भाववाढ या संकल्पनेची व्याख्या लिहा.

३. 'रोख निधी प्रमाण' म्हणजे काय?

४. सार्वजनिक वितरण प्रणालीची मुख्य उद्दिष्टे कोणती?

५. भारतातील सार्वजनिक वितरण प्रणालीचे कोणतेही दोन फायदे लिहा.

**७. पुढील प्रश्नांची पाच किंवा सहा वाक्यांत उत्तरे लिहा (कोणतेही एक) :** **[४]**

१. वस्तू आणि सेवांच्या पुरवठ्यात घट होण्याची कारणे कोणती?

२. व्यापारातील सर्वसामान्य गैरप्रकार कोणते?